**पोलीस उप-आयुक्त मुख्यालय, पिंपरी-चिंचवड**

पत्ता :- पोलीस आयुक्तालय, पिंपरी-चिंचवड, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे-४११०३३

दूरध्वनी क्र.- ०२०-२७३५०१२०

ई-मेल आयडी - dcphq.pcpc-mh@gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.पो.उप-आ./गुन्हे/सावकारी / /२०२२ चिंचवड, दि.२३/०७/२०२२

## प्रेसनोट
## जाहीर आवाहन

सन २०२० मध्ये कोरोना महामारी मुळे शासनाने जारी केलेल्या लॉकडाऊनमुळे व जागतिक मंदीमुळे संपुर्ण जगामध्ये तसेच पर्यायाने भारतामध्ये सर्व प्रकारच्या उद्योग व्यवसायामध्ये आर्थिक नुकसान झाल्याने नोकर कपात झाली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये बेरोजगारीची वेळ येवून त्यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये बऱ्याच वेळा अनेक नागरिकांना त्यांची गरज पाहून, गैरकायदेशीर सावकारी करणारे इसमांकडून अवाजवी दराने व्याज घेतलेल्या कर्जाचे रक्कमेपेक्षा जास्त पैसे उकळले जातात. कर्जदार यांनी घेतलेल्या व्याजाचे पैश्याची परतफेड करुन सुध्दा खाजगी सावकार वांरवार पैश्याची मागणी करतात, काही प्रसंगी कर्जदारांना धाकदपटशा करुन, त्यांच्या मालकीच्या किंमती वस्तू दुचाकी वाहन, इलेक्ट्रीक वस्तू (टिव्ही, फ्रिज वैगेरे) बळजबरीने उचलून नेतात. अशाप्रकारे खाजगी सावकार हे कर्जदार लोंकाची विविध प्रकारे पिळवणुक करीत असतात. याबाबत खंडणी विरोधी पथकाने प्राप्त तक्रारी अर्जावरुन निगडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३६१/२०२२, भादवि कलम ४५२,३६५,३८७,४२०,३४ व महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम ३९,४५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व नागरिकांना याव्दारे जाहीर आवाहन केले आहे कि, जर आपणास कोणीही व्यक्ती अडवणुक,दमदाटी करणे असे प्रकार करत असेल तर आपण आपल्या नजीकच्या पोलीस ठाणेस आपली तक्रार निर्भीडपणे नोंदवावी. तसेच त्याबाबत काही अडचण भासल्यास पोलीस आयुक्त कार्यालय येथे संपर्क साधावा. आपले तक्रारीची दखल घेवून गैरकायदेशीर सावकारी करणारे इसमांविरुध्द महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ तसेच आवश्यक कायद्यान्वये गुन्हे दाखल करुन, सदर गैरकायदेशीर सावकारी प्रकारास प्रतिबंध करण्यात येईल.

(डॉ.काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी-चिंचवड